# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date: 17 November 2024

## Time: 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक: १७ नोव्हेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

संरक्षण संशोधन आणि विकास संस्था -डीआरडीओनं काल मध्यरात्रीनंतर ओडिशाच्या किनारपट्टीवरील डॉ. एपीजे अब्दुल कलाम स्थानकातून भारताच्या पहिल्या लांब पल्ल्याच्या हायपरसॉनिक क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी केली आहे. हे हायपरसॉनिक क्षेपणास्त्र सशस्त्र दलांना दीड हजार किलोमीटरहून अधिक अंतरापर्यंत विविध पेलोड वाहून नेण्यासाठी तयार करण्यात आले आहे. दरम्यान, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह यांनी उड्डाण-चाचणीला ऐतिहासिक यश म्हटलं असून या कामगिरीमुळं भारताचा प्रगत लष्करी तंत्रज्ञानाची क्षमता असलेल्या देशांच्या निवडक गटात समावेश झाला आहे.

****

भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव-२०२४ च्या आंतरराष्ट्रीय निवड समितीच्या अध्यक्षपदी चित्रपट निर्माते आशुतोष गोवारीकर यांची निवड करण्यात आली आहे. “जोधा अकबर” , “लगान” आणि “स्वदेश सारख्या चित्रपटांची निर्मिती गोवारीकर यांनी केली आहे. येत्या २० ते २८ नोव्हेंबर या कालावधीत गोवा इथं हा चित्रपट महोत्सव होणार आहे. या निवडीबद्दल गोवारीकर यांनी आनंद व्यक्त केला असून सातत्यानं विकसित होत असलेले चित्रपट पाहण्यासाठी हा महोत्सव म्हणजे उत्तम व्यासपीठ असल्याचं ही त्यांनी म्हटलं आहे.

****

विधानसभा निवडणुकीसाठी अखेरच्या टप्प्यामध्ये नाशिक जिल्ह्यात महायुतीच्या नेत्यांच्या आज सभा होत आहेत. भाजप नेते आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची चांदवड इथं आज दुपारी तर सायंकाळी सहा वाजता नाशिकमध्ये सभा होणार आहे. शिवसेना नेते तथा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचीही आज मालेगाव इथं दुपारी सभा होत आहे.

काल रात्री मालेगाव इथं एमआयएम पक्षाचे नेते असुदोद्दीन ओवैसी यांची सभा झाली. पक्षाचे उमेदवार मौलाना मुफ्ती यांच्या प्रचारासाठी आयोजित सभेत त्यांनी केंद्र सरकार वक्फ बोर्ड कायद्याच्या माध्यमातून वक्क्फ बोर्डाकडे असलेली संपत्ती ताब्यात घेण्याच्या तयारीत असल्याचा आरोप केला. मराठा समाजाचे नेते मनोज जरांगे पाटील यांची काल येवला इथं सभा झाली, या
सभेत त्यांनी मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना पराभूत करण्याचं आवाहन केलं. शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार अनिल कदम यांच्या समर्थनार्थ पक्षाचे नेते संजय राऊत यांची  निफाड तालुक्यात तर नाशिकमध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षाचे उमेदवार दिनकर पाटील यांच्या प्रचारासाठी सभा घेतली.

****

ठाणे जिल्ह्यातील १८ विधानसभा मतदारसंघांमधून आतापर्यंत एकूण २७ कोटी ६८ लाख ६६ हजार रुपयांचा मुद्देमाल प्रशासनानं जप्त केला आहे. यात मद्यसाठा, अंमली पदार्थ,  मौल्यवान वस्तू, दागिने आणि मोफत वाटपाचं इतर साहित्यांचा समावेश आहे.

****

कोल्हापूरमधल्या राजारामपुरी इथं एका वाहनातून निवडणूक भरारी पथकानं १० लाख ९५ हजार रुपये जप्त केले. जप्त करण्यात आलेल्या रकमेची आयकर विभागामार्फत पडताळणी करण्यात येणार असल्याची माहिती कोल्हापूर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी  डॉ. संपत खिलारी यांनी दिली आहे.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’  हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी सात वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज सांगली जिल्ह्यातल्या विधानसभा मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

विधानसभा निवडणुकीत मतदानाची टक्केवारी वाढावी यासाठी परभणी जिल्हाधिकारी कार्यालय आणि मतदान जनजागृती विभाग तसंच परभणी जिल्हा सायकल संघटनांच्या वतीनं शहरात आज सायकल रॅली काढण्यात आली. प्रारंभी जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे यांच्या उपस्थितीत सर्वांना मतदान करण्यासंदर्भात

शपथ देण्यात आली. समारोपात सहभागी सायकलपटूंना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आलं.  या रॅलीत ८ वर्षापासून ते ६० वर्षांपर्यंत सायकलस्वार सहभागी झाले होते.

****

धुळे जिल्ह्यात मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विविध स्तरावर प्रयत्न सुरु असून विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. त्यानुसार, संपूर्ण शिरपुर तालुक्यातल्या सर्व प्राथमिक, माध्यमिक शाळा, महाविद्यालय यांच्यामार्फत आज मतदार जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीत मतदानाचे महत्व पटवून देत मतदान करण्याबाबत मतदारांमध्ये जागृती करण्यात आली.

****

विधानसभा निवडणूकीच्या अनुषंगानं मतदारांमध्ये जनजागृती करून त्यांना मतदानासाठी प्रवृत्त करण्यासाठी स्वीप उपक्रमा अंतर्गत पालघरमध्ये आज सकाळी रन फॉर वोट चं आयोजन करण्यात आलं. यात तीन किलोमीटर आणि पाच किलोमीटर मॅरेथॉनमध्ये पालघर शहर, वसई-विरार महानगरपालिका क्षेत्र तसचं पालघर जिल्ह्यातल्या शाळा-महाविद्यालयातील १८ वर्षाखालील मुलं आणि मुली, १८ वर्षावरील युवक, युवती, ज्येष्ठ नागरिक आदींनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

****